# उत्तम मोहितकार



# अघोर

## उत्तम मोहितकार

## ई साहित्य प्रतिष्ठान

# अघोर

लेखक : उत्तम मोहितकार

पता:महांकालपूर,  पोष्ट:कायर, ता:वणी, जि:यवतमाळ

शिक्षण:नववा वर्ग

उद्योग :शेतकरी

uttammohitkar@gmail. com

फ़ोन : 9049120265

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य,  चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

©esahity Pratishthan®2014

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अर्पणपत्रिका

ज्याने मला ही कथा लिहिण्यास प्रोत्साहित केले, म्हणजे माझे वडील

श्री. तुळशीराम सदाशिव मोहितकार

ह्यांचे चरणी ही कथा अर्पण

नाव:उत्तम मोहितकार

पता:महांकालपूर, पोष्ट:कायर, ता:वणी, जि:यवतमाळ

शिक्षण:नववा वर्ग

उद्योग :शेतकरी

# मनोगत



नरबळी ही समाजातील विकृती आहे. पूर्वीच्या काळी कोलामबांधवात कोणत्याही सण, समारंभ व मुहूर्तावर नरबळी देण्याची प्रथा होती. आमच्या चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरालगत भागातील आदिवासीसुद्धा याला अपवाद नव्हते. आमच्या गावातील काही बुजूर्ग म्हणजे मुख्यत्वे फकरू पा. खरवडे व मारोती पा.

मोहितकार ह्यानी मला एक घटना सांगितली. ती पुढे.

साठ-सत्तर वर्ष्यापूर्वी म्हणजे फकरू खरवडे त्यावेळी दहा-बारा वर्ष्याचे असेल, तेव्हा आमचा महांकालपूर गाव नवीन बसला होता. त्यावेळी आमच्या गावात फक्त पाच-सहा घरे होती. तेव्हा वेळूच्या कामट्यापासून बणविलेले कुडाची घरे त्यावर गवताचे छपर होते. एकदा फकरू खरवडे त्यांचे वडील व मारोती मोहीतकार हे त्रिकूट वेळू आणन्यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील राजूरा तहसीललगत मुलताई भागात गेले. (त्यावेळी ह्या भागाला मुलताई संबोधले जायचे. ) जिथे दाट जंगलात आदिवासी पाडे होते तिथेच त्यानी आपला शामियाना उभारला. आपल्या लगत जवळपास आदिवासींची वसाहत आहे हे त्यांना ठाऊक नव्हते. रात्रभर त्यानी तिथेच मुक्काम केला, व दुसऱ्या दिवशी सकाळीच ते वेळू तोडण्यासाठी जंगलात रवाना झाले. पुढे चांगले वेळू असेल म्हणून ते आणखी पुढे गेले, तेव्हा त्यांना एका वडाच्या दाट विस्तीर्ण झाडावर मानवी कवटी, हात, नखे आढळली. हीच ती नरबळी

देण्याची जागा! ते पाहून ह्या त्रिकुटाची पाचावर धारण बसली. इथे राहणे योग्य होणार नाही म्हणून त्यानी तिथून काढता पाय घेतला. आपल्या शामियानालगतच भराभर मिळेल ते वेळू तोडून त्यानी गाव जवळ केले.

याचा अर्थ पूर्वी आपल्या देशात नरबळी देण्याची प्रथा होती. व ती अपवादात्मकरित्या आजतागायत चालू आहे. सांप्रत वर्तमानपत्रात आपण असे दोनेक उदाहरण किंवा जास्त वाचले असेल. ह्या संगणकीय युगात विज्ञानाने कितीही प्रगती केली असली तरीही असे 'नरबळी'चे प्रकार सर्रास अनुभवायला मिळतात.

प्रस्तुत कथा ही इ. स. १६०० सालची सत्यघटना असून माझ्या आजोबांचे आजोबा नागोबा मोहितकार ह्यांच्यावर गुदरलेला प्रसंग आहे. त्यानीच ही कथा माझ्या आजोबाला, आजोबाने माझ्या वडिलांना व वडिलांनी मला, असा प्रवास करत आता ती वाचकांपर्यंत

पोहोचत आहे.  वाचक ह्या कथेचे स्वागत करतील अशी आशा आहे.  माझी ही “अघोर” कथा ई साहित्य प्रतिष्ठानने आपल्या वेबसाईटवर ईबूक स्वरूपात प्रसिद्ध केल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठानच्या सर्वच टीमला मी धन्यवाद देतो.  काही त्रुटी आढळल्यास वाचकांनी तसे कळवावे म्हणजे मार्गदर्शन होईल.  असो!

उत्तम मोहितकार.

महांकालपूर,

ता:वणी,  जि:यवतमाळ

# अघोर

अदमासे इ. स. १६०० सालची ही गोष्ट आहे. माझे पूर्वज माझ्या आजोबांचे आजोबा ह्यांचेवर गुदरलेला हा प्रसंग आहे. ही सत्यघटना असून माझ्या आजोबांनी माझ्या वडिलांना व माझ्या वडिलांनी मला प्रस्तुत कथा सांगितली. ती शब्दबद्ध करून वाचकांच्या सेवेस सादर करीत आहे.

माझे पूर्वज मूळचे आंध्रप्रदेशातल्या आदिलाबाद जिल्ह्यातले. त्यावेळी आपल्या देशात घनदाट अरण्ये होती. अरण्यात वाघ सिंह, अस्वल, तरस, लांडगे, अशी हिंस्त्र श्वापदे होती.

दिवसाढवळ्या बाहेर पडायला भिती वाटायची. दिवसा बाहेर पडायचे म्हणजे जीव मुठीत कोंबूनच! जो कुणी दूरवर व निघाला त्याची परतेपर्यंत शाश्वती नसे.

तेंव्हा आजच्यासारखी वाहने नव्हती. पांच-सहा किलोमीटर अंतरावर गांवे नव्हती. दोन गावातील अंतर ३०-४० किलोमीटरच्या दरम्यान असायचे. पांच-सहा घरांची छोटी - छोटी गांवे असायची. दोन गावाला जोडायला रस्ते तरी कुठले! घनदाट अरण्य कापीत पायवाटच पुढं गेलेली असे.

अशाच एका पेलगोंडा नामक गावात नागोबा मोहितकार नावाचा एक इसम राहत होता. स्वभावाने गरीब, सालस, सज्जन प्रवृत्ती व मनमिळावू होता. सर्वांशी मिळूनमिसळून वागत असल्यामुळे, गावात त्यांना मान होता. ५-६ घराची वस्ती होती. गावालगत जंगल तोडून साफसूफ केलेली ५-६एकर जमीन आणि सोबतीला एक म्हैस, दोन रेडे हीच नागोबाची दौलत आणि सर्वस्व.

त्याकाळी आजच्यासारखी प्रगत शेती नव्हती. खूप खपूनही पोटापुरते धान्य पिकत नव्हते. जंगलातील फळे, कंदमुळे, मोहफुले यावर वर्षभर गुजराण व्हायची. कुडाची घरे आणि त्यावर गवताचे छप्पर असायचे. पेलगोंडा गावापासून पुर्वेस ५किलोमीटर अंतरावर कोलाम ह्या मागास जमातीचे ५-६घराचे पोड होते. (आता ही जमात पूर्वीसारखी मागासलेली राहिली नाही. ) त्या पोडाच्या परिसरात घरावर झाकाळण्याच्या कामी उपयुक्त असे गवत महामूर मिळत असे. लांबच लांब गवताची कुरणे होती त्यामुळे गवताची कमतरता कुणालाही भासत नसे. ते गवत आणायला गावातल्या काही लोकांसमवेत नागोबा बैलबंडी घेऊन जंगलात जात असे. पोडावरील कोलामाला मजूरी देऊन त्यांच्यामार्फत गवत कापून आणणे,  हा त्यांचा नेहमीचा शिरस्ता असल्याने कोलामासोबत नागोबाची चांगलीच मैत्री जुळली.  तेंव्हापासून वारलू नावाचा कोलाम नागोबाच्या घरी नेहमी ये-जा करायचा. नागोबाकडून तो तुरी,  मुंग न्यायचा. परस्परात त्यांनी साळू भाटव्याचे नाते जोडले; आणि नंतर ते संबंध अधिकच दृढ झाले.

कोलाम पोडावरील कोलाम दरवर्षी तिळाचेच उत्त्पन्न काढत असे. तीळ कापणीस आला की, दरवर्षी सर्व कोलाम बांधव एक उत्सव साजरा असे. 'बळी' हे त्या उत्सवाचे नाव. ते कुठून तरी पकडून आणलेल्या एखाद्या माणसाचा 'बळी' शिवेवरील देवतेस अर्पण करीत असे. दरवर्षी नित्यनेमाने तीळ कापणीच्या वेळी त्यांचा 'बळीचा' कार्यक्रम ठरलेला असे. ह्या उत्सवात रात्रभर नांचगाणे व्हायचे.

रात्री बारा वाजले की, पकडून बांधून आणलेल्या बळीस देवतेसमोर हजर केले जायचे. त्या बिचाऱ्यास काय माहित आपल्यासमोर काय वाढून ठेवले आहे ते! तो बेत पाहून पकडून आणलेल्या माणसाला सर्व रहस्य समजून साहजिकच देव आठवायचा; तो रडायचा, तळमळायचा, गयावया करायचा परंतु, समोरच 'जीवघेणा देव' असल्यामुळे कितीही धावा केला तरी, सर्व प्रयत्न निष्फळ ठरत. बळीची पूजा केली जात; व त्यानंतर बळीच्या मानेवर

एक भला मोठा सुरा ठेवला जात मानेवर सुरा फिरला की निष्पाप देह वेदनेनं तळमळत. यावेळी सर्व कोलाम आनंदाने टाळया पीटत. शेवटी तळमळणारा देह एकदाचा शांत होत. देवतेला रक्ताभिषेक घातला जात. रात्री सर्वांच्या घरी गोड पदार्थ केलेले असल्याने पोरं तर खूप खुषीत असायची; कारण बारा महिन्यातून एकदाच त्याच्या घरी गोडधोडाचा बेत असे. बळीच्या ह्या (अंधविश्वासू) कार्यक्रमामुळे आपल्याला भरपूर उत्पन्न मिळेल अशी खोटी धारणा त्या कोलाम बांधवाची होती. बळीचा कार्यक्रम उरकल्यानंतर दुसऱ्याच दिवसापासून तिळाची कापणी चालू होई.

बळीची ही प्रथा त्याकाळी कुणालाच माहित नव्हती. इतर समाज ह्या प्रथेपासून अनभिज्ञ होता. म्हणून एकदा नागोबावर ह्या बळीचा बकरा बनण्याचा प्रसंग गुदरला होता.

नेहमीप्रमाणे तीळ कापणीस तयार झाला; ते पाहून नेहमीप्रमाणे याहीवर्षी तीळ कापणीपूर्वी बळीचा कार्यक्रम आटपायला पाहिजे अशी चर्चा कोलामबांधवामध्ये जोर धरू लागली. तत्पूर्वी यावर तोडगा काढण्यासाठी कोलामबांधवाने एक सभा आयोजित केली. येरलू नावाचा कोलाम त्या गावातील म्होरक्या असल्याने तोच ह्या सभेचा मुख्य होता. त्याने बळी पकडून आणन्यास सर्वांना आदेश दिले. परंतु बळी पकडून आणने हे सोपे काम नव्हते. सहजासहजी असा माणूस सापडणे मुश्कील, जिकिरीचं आणि कष्टाचे काम होते. पेरलू नावाच्या कोलामाने ही समस्या सर्वांसमोर व्यक्त केली.

"दाजी, आजकाल असा मानूस सापळने लई तरासाचं काम हायेत. तवा म्या मनतो, आपुन ५-६ जन सोबत घेवून हे काम कराया पायजे, थ्ये बेस व्हईल"

"पेरलू भौच मनन बरूबर हैत, तवा आपुन५-५जन यकत्र यवून बळी पकडाया जावं, मंजे आपनास्नी बळी पकडाया तरास जानार नाय!" दामाने पेरलुच्या प्रस्तावाला मंजुरी दिली.

पण वारलुचे तिकडे लक्ष नव्हते. तो कसल्यातरी विचारात गढला होता. सर्वांच्या नजरेस ही गोष्ट आल्याने त्यानी एकसुरात म्हटले, "आब्बा वारलू तूत्त काहीबी बोलत नाय!असा कोंचा इचार करून तायला गा?मंगापासन खाली मुनकं घालून!"

आतापर्यंत पुतळयासारखा स्तब्ध झालेला वारलू एकदम हलला.

"म्या मनतो तो पेलगोंड्याचा नागोबा हैत ना. . . "

"मंग" वारलुचे वाक्य मध्येच तोडत बालाजी म्हणाला.

"आबे! आयकून त्त घे, भडव्या! मी का सांगतो त्ते? "

"बर, सांग?"सर्वांचे कान वारलुकडे फिरले. वारलू सांगू लागला.

"म्या मनतो, थो पेलगोंड्याचा नागोबा मोहितकार हायेत ना, थ्यालेच आपून बळी देवू"

"थ्ये कस शक्य व्हईल बा! का, थो रायतो पेलगोंड्याला, आन थ्याले तेथून धरून आनाचं कसं, थे त्त तुच सांग बा, आमाले वारलू?" एकाने शंका उपस्थित केली.

"आबे, त्त आयकून त्त घे, मंदातच काहालेका मिरची टाकते. !"वारलुने दम भरल्यावर तो लोण्यावाणी पिघळला, व शांत झाला.

"हे बगा!"वारलू सांगू लागला, "आपन बळीचा कारेक्रम ठिवतो ना?"

"होय!" सर्व एकसुरात गरजले.  वारलू सांगू लागला,

"मंग आपून नागोबाले कारेक्रमाचू आवतन देवू!"

"बळीचा कारेक्रम मनल्यावर थो यईल का? मले नाई वाटतं बा, थो यईल मनून !" कुसऱ्या पुन्हा बोलला.

"बे त्त भडव्या! उगा रायते का नाई,  मंगापासन लेकाचं टरंगटरंग करून रायला.  का तुलेच देऊ बळी!"

म्होरक्याचा पारा भडकलेला पाहून कुसऱ्या थिजला.  त्याने तोंडाला कुलूप लावले. वारलुने आपली गाडी पुन्हा रुळावर आणली. चक्की चालू केली. तोंडाचा पट्टा पुन्हा वाजू लागला.

"नागोबाले ह्या कारेक्रमाईशयी काईबी ठाव नाय. नागोबाले म्या आमचा यक सन हाये मनून जेवाचं आवतन देतो आन थ्याले ईत बलावून आनतो. मंग आपून थ्याले धरून बळी देऊ, कस्स!"

"वा! वारलू आपून मानल बा तुले !"

ढग गरजावा तसे सर्व गरजले.  आता कुसऱ्याच्या डोक्यात प्रकाश पडला. विजेचा झटका बसल्यासारखा त्यानं हात झटकला. बोटाने चुटकी वाजवून झाल्यावर त्याचे तोंड वाजू लागले.

"वा! वारलू काय मस्त दिमाख हाये गा तुवा! मले त्त हे मालुमच नोहतं, का असा यकादा इचार तुया डोक्श्यातून यईल मनूनं. आपन मानल बा तुले!"

"भडव्या तुले मंगापासन सांगत व्हतो तवा तू आपलाच टपरटपर करीत व्हता. मंगा म्या झाळपाला बुरत व्हतो का? आत्ता तुले पटल, बरं थे जावू देत"

वारलुच्या कुरघोडीवर सर्व चमत्कारीकरित्या हंसले. मोरक्या शब्दाची उधळण करू लागला. हाताच्या ओंजळीत हनुवटी धरून सर्व ऐकू लागले.

"वारलू चांगल्या कामासाठी यळ काहाले दवळाचा. आपला तीळ बी कापाले होऊन रायला, तवा तू हे काम आजच आटपायले पायजेन!"

"दाजी, तुमी फिकीर करू नोका . . . . " मध्येच बोलणे थांबवून आणि आकाशाकडे पाहत हात उंचावून वारलू पुन्हा पुटपुटला, "नाग्याले मी आनतो की नाय थे पाहातच ऱ्हा! आजच पाह्यटी निगतो म्या!"

वारलु ह्यावेळी बळीच्या सुळावर चढलेला असल्याचे स्वप्नं पाहत होता. स्वप्नात नागोबा किंचाळत व गयावया करीत होता. वारलुने स्वप्नातच दोन्ही हात उंचावून तलवार चालवायला सुरूवात केली; आणि नागोबाचे मुंडके धडावेगळे केले. धप्प असा आवाज आला. वारलुने डोळे उघडले. त्याच्या हाताचा तडाखा झिपऱ्याला बसला होता. वारलू सावरला. तडाखा बसल्याने झिपऱ्या चवताळून उठला. सारे विस्मयचकीत होऊन पाहू लागले.

" साल्या !मले मारते, माहा बळी देतो मंतो की काय? थांब तुले इंगा दावतो !"

असे म्हणून. झिपऱ्या वारलुच्या अंगावर धाऊन गेला. झिपऱ्या मुळातच दणकट. बांध्याचा असल्याने एका तडाख्यात त्याने वारलुला भूमिशयन करायला लावले. आणि तो वारलुच्या छातीवर बसून जोरजोरात बुक्याचा प्रसाद देऊ लागला. वारलू मेलो, मेलो म्हणून ओरडू लागला.

आतापर्यंत बघ्याची भूमिका घेणाऱ्यानी बांका प्रसंग ओळखला. घटनेचे गांभीर्य ओळखून सर्व वारलुच्या मदतीला धावले. सर्वांच्या मध्यस्थीने झगड्याला लगाम लावला; परंतु वारलुने आपल्याला लोकासमक्ष मारून आपला अपमान केला , ही बोच झिपऱ्याला बोचत होती. केव्हातरी आपण ह्याचा काटा काढूच असा विचार करीत झिपऱ्याने घर जवळ केले. सर्व आपापल्या घरी गेले.

रात्री सुडभावना जागृत झालेल्या झिपऱ्याचा डोळा लागला नाही. तो आणखीनच विचारांच्या खोल गर्तेत जाऊन पडला. वेड्यासारखा बडबडू लागला, विक्षिप्त. हातवारे करू लागला. अधूनमधून दातओठ खात तो हाताच्या मुठी आवळू लागला. एकंदर सुडभावनेने तो पूरता पेटून उठला होता. झिपऱ्या कधी बसत, तर कधी उठत. आता त्याला राहवेना. "आपन बदला घ्यायचाच! साल्याने आपला अपमान केला, त्याला जिवंत कशापायी ठिवायच" असा कृर विचार झिपऱ्याला जास्तच सतावू लागला. "बस्स, झालं साल्याले आता खल्लास केलं पाहिजे चाल झिपऱ्या"

झिपऱ्या वीज चमकल्यावानी ताडकन उठला. झपाझप पावले टाकत तो झोपडीच्या आतील भागात गेला. इकडे तिकडे इतस्ततः काहीतरी शोधू लागला . त्याला एकाएकी काय आठवले कुणास ठाऊक फिरता फिरता तो एकदम उजव्या बाजूला वळला . त्यावेळी विस्तव पेटवीने फार जिकिरीचे व कष्टाचे काम होते. म्हणून लाकडाच्या साहाय्याने

अखंड विस्तव पेटत ठेवावा लागे. झॊपडीच्या एका कोपऱ्यात मंद तऱ्हेचा विस्तव पेटला होता. झिपऱ्याने फुंकर मारून जाळ वाढवला, त्यासरशी झोपडी अधिक प्रकाशमान झाली. त्या प्रकाशात. झोपडीतील प्रत्येक वस्तू चमकू लागली. झिपऱ्याची नजर झोपडीत फिरू लागली. आणि चर्येवर एकदम हास्य फुलले. तो पुढे सरसावला. पुढे कुऱ्हाड झिपऱ्याच्या हाताची प्रतीक्षा करीत होती. नकळतपणे झिपऱ्याचा हात पुढे सरकू लागला. हाताला कुऱ्हाड लागली. हाताचा तळवा अलगदपणे कुऱ्हाडीला लपेटला गेला. कुऱ्हाड हातात येताच विकट हास्य करीत झिपऱ्याने ती तपासली. कालच धार दिल्याने तिला आज घासायची गरज नव्हती. तो वेड्यासारखा हसू लागला. झिपऱ्याचे हास्य ऐकून त्याची बायको मुले उठली; पण ते अर्धवट झोपेत असल्याने झिपऱ्याचे हास्य बायकामुलांना एखाद्या स्वप्नवत वाटले. आणि ते पुन्हा झोपी गेले व एका भयानक स्वप्नात रममाण झाले.

झिपऱ्या बाहेर आला. सगळीकडे काळाकुट्ट अंधार. . . . . . . . भयाण शांतता. . . . . . . रातकिड्याची किर्रकिर्र ऐकू येत होती. अधूनमधून टिटवीचे ओरडणे ऐकू येत होते, त्यामुळे शांतता भंग होत होती.  वारा शांत असल्याने झाडे न हालता स्तब्ध उभी होती. झिपऱ्याला बघून ती स्तब्ध झाली की काय असा भास व्हावा! फक्त अपवादात्मकरित्या दूरून कुठूनतरी कोल्हेकूई व कुत्र्याचा भुंकण्याचा आवाज येत होता.

त्या अंधारात चार वाटा चार दिशेला अंधुकशा दिसत होत्या. त्यापैकी एक वाट झिपऱ्याने पकडली. शरीर पुढे सरकू लागले पाय भराभर उचलले गेले. चालता चालता तो पोडाच्या डाव्या बाजूला झुकला.  चार पावले पुढं सरकला आणि ब्रेक लागल्यागत थांबला. समोर त्याला झोपडीचा झोपा दिसत होता. हीच ती वारलुची झोपडी. झिपऱ्याने सावधपणे हळूच झोपा उघडला,  व चोरपावलांनी तो आत जाऊ लागला. पुढं जाऊन पाहाते तो वारलू खाटेवर नव्हता. नागोबाला 'बळी ' सणाचे आमंत्रण द्यायला तो केव्हाच निघून गेला होता.

खाटेवर अंथरूणाशिवाय काहीही नव्हते. आपला बेत फसलेला पाहून झिपऱ्याचा चेहरा खर्रकन उतरला. आत्यंतिक क्रोधाने त्याचा चेहरा लाल झाला. डोळयांत अंगार तराळू लागला. "साला! पेलगोंडाले गेला वाटतं, मनून वाचला . पन म्या साल्याले सोळनार नाय. हा. . हा. . हा. . हा. . . "दाणादाण पावले आपटत झिपऱ्या घराकडे निघून गेला.

वारलू अगदी पहाटेस पेलगोंडा गावाला निघाला होता. कोचरमुंडी आणि पेलगोंडा दोन गावातील अंतरही कमी असल्याने उजाडण्यापूर्वीच तो पेलगोंडाला पोहोचला नागोबा ह्यावेळी म्हशीचे दूध काढण्यात मग्न होता.

"रामराम हो भाटो" वारलुने नमस्कार करीत म्हटले. दूध काढता काढता नागोबा म्हणला, "रामराम! आब्बा येवढ्या सकाळी कसं म्हून येनं केलं?"

"येक काम होत नागू तुयाकळ!"

"कोंच बा! बरं बस, मी आलोच दूद काळून! मंग सइस्तर बोलू. सकूबाई बाज टाक व माह्या भाटोले! माझा भाटो आला हायेत!"

"कोंचा बा तुमचा भाटो?" असे म्हणून सखूबाई बाहेर येऊन पाहते.

"आब्बा, भावजी व्हय का? भावजी तुमी सकाळीस कसं म्हून येनं केलं? या भावजी बसा बाजीवर"

असे म्हणून सखूबाईंने वारलुचे चांगले आगत-स्वागत केले. व कुडाला टेकून असलेली एक खाट उचलून ओसरीत टाकली. हाशहुश करत वारलू खाटेवर बसला. तोवर नागोबा दूध घेऊन आला. सखूबाई आपल्या कामात गर्क झाली. नागोबाने दूध आत नेऊन ठेवले आणि हात धुवून वारलूजवळ येऊन बसला. वारलुला क्षेमकुशल विचारले. वारलुने सर्व कुशल-मंगल आहे असे सांगून सकाळी येण्याचे प्रयोजन इत्यंभूत सांगितले. आणि

नागोबाला उद्या आपल्या सणाच्या पाहुणचारासाठी येण्याचे आमंत्रण दिले. नागोबाने आमंत्रण स्वीकारले व उद्या  येण्याचे कबूल केले. जेवनखाण झाल्यावर वारलू आपल्या पोडाकडे रवाना झाला.

दुसऱ्या दिवशी  आपले नित्य व्यवहार आटोपून नागोबाने कोचरमुंडीकडे प्रयाण केले. माध्यांन्ह काळात तो कोचरमुंडीला पोहोचला.  तिथे वारलू नागोबाची वाटच पहात बसला होता. नागोबा दिसताच वारलुने त्याचे चांगले आगत-स्वागत केले. दिवसभर विविध पक्वान्नांची मेजवानी दिली;  जेणेकरून नागोबाला कोणताही संशय येणार नाही ही त्यांची भोळी समजूत होती.  बळीच्या कार्यक्रमाला अजून बराच अवकाश होता. हा कार्यक्रम ठीक रात्री १२ वाजता होणार होता. नागोबापुढे बऱ्याच मेजवान्या येत होत्या,  हे पाहून नागोबाला कोलामबांधवात मानूसकी दिसली.  परंतु ही त्याची चुकीची समजूत होती.  हे कोलाम आपल्याशी असे मानूसकीने का वागत आहे, ह्याची थोडीदेखील शंका नागोबाला

आली नाही. कारण सर्व कोलाम नागोबाशी अदबीनं प्रेमान वागत होते. म्हणून आपल्यापुढ्यात काय वाढून ठेवले आहे ह्याविषयी नागोबा साशंक होता. वारलुच्या खोट्या सदयेतून खऱ्या निर्दयतेचा उदय होणार होता.

शेवटी संध्याकाळ झाली. सूर्य क्षितिजाकडे वळला व थोड्याच वेळात अस्ताला गेला. त्यासरशी सगळीकडे संसाराचे साम्राज्य पसरू लागले. क्षण-क्षण सरकू लागला. घंटोगणीक अंधार दाटतात चालला. यावेळी नागोबाला शौचास लागली. तशी इच्छा वारलूजवळ बोलून दाखविताच वारलुने पाण्याने भरलेले एक गाडगे नागोबाला दिले; व शौचविधी कार्यक्रम जागेकडे अंगुलीनिर्देश केला.

नागोबा तिकडे जाऊ लागला. पोडाच्या बाहेर गेल्यावर काही अंतरावर नागोबाला एक वृद्ध स्त्री दिसली. जणू देवताच ती, नागोबाच्या मदतीला धावून आली! नागोबाजवळ येऊन ती त्याला सावध करू लागली,

"बापू! तू इकडे आला खरा, पन तुले हे कोलाम बळी देनार हैत; तवा तू येथूनच पळून जा!"

"अरे बापरे! ह्याचा असा हेतू होता तर, मनून तर हे कोलाम मले पकवानाची मेजवानी देत होते. नागोबाच्या डोळ्यापुढे काजवे चमकले. तो सावरला. त्याला त्या परिसरात साक्षात मृत्यू भटकटांना दिसला. त्याने हातातील डबा फेकून दिला; आणि पलायन करणार तोच ती वृद्धा म्हणाली, "बापू तू लई दूर जा, आणि रस्त्याच्या कडेला दाट जंगलात यक झाळ पाहून त्या झाळावर चढून लपून बस. तुया मागं हे कोलाम धावत येईन. तुयाच्याने धावने व्हनार नाय, मनून म्या तुले हे सांगून ऱ्हायली. तू रस्त्यात सापळू नये मनून रस्त्यापासन दूर दाट झाळीत तू लपून ऱ्हाय बरं!

नागोबा म्हातारीचे बोलणे ऐकत असता भीतीने थरथर कापू लागला. थंडीचे दिवस असूनही त्याला दरदरून घाम फुटला. नागोबाने तिचे शेवटचे वाक्य ऐकले असेल नसेलही, तिला धन्यवाद देऊन त्याने तिथून काढता पाय घेतला.

शक्य तेवढ्या वेगाने तो रस्त्याने धावू लागला. भीतीयुक्त अंतःकरणाने तो पुष्कळ अंतर धावला. तरूणपणात तो आयुष्यात धावला नसेल येवढे अंतर म्हातारपणात धावला. कमी वेळातच त्याने जास्त अंतर पार केले.

धावून-धावून असे किती धावणार ? धावण्याची सवय नसल्याने लवकरच त्याला धाप लागली, आता आपण जास्त धावू शकत नाही हे नागोबाने ताडले; रस्त्याने हळूहळू जाणे धोकादायक होते. कारण आपण पलायन केल्याची चुणूक लागून. हे कोलाम लवकरच आपल्याला शोधत येण्याची शक्यता आहे. कोलामबांधव हे मुळातच शिकारी असल्याने आपल्याला शोधत ते वेगाने कोणत्याही क्षणी इथे धडकू शकते . वेळ ही अमूल्य असते आणि

ती याक्षणी दवडणे म्हणजे शुद्ध मूर्खपणा ठरेल, हे नागोबाला कळून चुकले म्हणून रस्त्याच्या कडेला दूर जंगलात एक दाट झाड पाहून तो त्यावर चढून बसला.

इकडे पुष्कळ वेळ झाला तरी नागोबा शौचाहून परतीचे चिन्ह दिसेना. नागोबाला आपल्या कार्यक्रमाची चुणूक लागून त्याने पलायन तर केले नाही ना ? असा सर्वांना संशय आला. तो पळाला नसेल, व कुणाकडेतरी बोलत बसला असेल. असेही त्यांना वाटले. आता येईल, मग येईल, थोड्या वेळाने येईल म्हणून सर्व वाट पाहू लागले; पण काहीच फायदा झाला नाही. आतातर नागोबा पळाला असल्याचा संशय अधिकच दृढ झाला. म्हणून कोलामाने शोधाशोध चालू केली, त्यापैकी काही कोलाम नागोबाला पकडण्यासाठी पेलगोंडाच्या रस्त्याने धावू लागले. ते पुष्कळ अंतर धावले पण नागोबा त्याला गवसला नाही.

बरेच अंतर धावल्यावर नागोबा ज्या रस्त्याच्या कडेलगत झाडावर बसला होता त्या रस्त्यावरून धावत येत असलेल्या कोलामाचा गोंगाट नागोबाला ऐकू आला. गोंगाट जसजसा अधिकाधिक जवळ येऊ लागला तसतसी नागोबाच्या छातीची धडधड वाढायला लागली. त्याला दरदरून घाम फुटला. कोलाम आपल्याकडे येऊ नये म्हणून तो मनोमन देवाचा धावा करू लागला.

पुष्कळ अंतर पार केले, तरी नागोबाचा पत्ता लागेना म्हणून सर्व कोलाम मागं फिरले. कोलाम माघारी परतून कोचरमुंडीकडे जात असल्याचे नागोबाला गोंगाटावरून कळले, तेव्हाच नागोबाने सुटकेचा निःश्वास टाकला. “बर झालं आपण वाचलो त्या वृद्धेने आपल्याला वाचवले” म्हणून तिचे व देवाचे मनोमन आभार मानले. देवानेच त्या वृध्देला आपल्या मदतीला पाठविले असा विचारही नागोबाच्या डोक्याला स्पर्शून गेला.

परंतु अजूनही नागोबाची छाती धडधडत होती. आपण खाली उतरलो आणि ते कोलाम वापस आले तर, पुन्हा पकडले जायचे असे नागोबाला वाटत होते; म्हणून तो लवकर खाली उतरला नाही.

बराच वेळ झाला गोंगाटाचा आवाज दूर -दूर होता; आणि शेवटी तो आवाज येईनासा झाला. नागोबाला हायसे वाटले. संकट टळले होते म्हणून नागोबाने सुटकेचा निःश्वास टाकला; आणि आरामात पेलगोंडाकडे रवाना झाला.

ही कथा म्हणजे मूळ कादंबरी स्वरूपात असून ती मुक्तललकार ह्या वणीतून निघणाऱ्या साप्ताहिकात मी प्रसिद्ध केली आहे. ऑनलाईन वाचकांच्या सेवेस आता त्या कथेचा सारांश मी सादर केला आहे. सद्या शेतीचा हंगाम चालू आहे म्हणून मी वेळेअभावी सारांश सादर करीत आहे. नंतर कधीतरी मी संपूर्ण कथा तुमच्या सेवेला हजर करीन.

ज्यांना पूर्ण छापील स्वरुपातले पुस्तक हवे असेल त्यांनी मला संपर्क साधावा.

uttammohitkar@gmail. com

फ़ोन : 9049120265

धन्यवाद!!

उत्तम मोहितकार

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठानच्या पुस्तक खजिन्यात साततत्याने नवनवीन भर पडत असते. आपण पहाता ना? नवीन सुमारे तीस पुस्तकं लवकरच येत आहेत. एकाहून एक भारी. सगळीच तुम्हाला हवी असतील तर संपर्कात रहा. VIP सभासद बना.

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे. आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं.

1. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचं पुस्तक ई मेलवर सर्वात आधी मिळतं. त्यांच्या कार्यक्रमाचं आमंत्रण मिळतं. त्यांच्या योजनांची माहिती मिळते. त्यांच्या कामात स्वतः सहभागी होण्याची संधी मिळते.

2. ज्या दहा किंवा अधिक मित्रांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं मिळाली की ते इतर लोकांना तुमच्याबद्दल सांगतात. त्यांच्यासाठी तुम्ही म्हणजेच ई साहित्यचे प्रतिनिधी बनता.

3. यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आमचा उद्देश आहे मराठीतल्या सहा कोटी साक्षरांना वाचक बनवणं. आणि हे लक्ष्य साध्य करणं हे केवळ आणि केवळ मराठी लोकांना त्यांच्या भाषेवर असलेल्या प्रेमातूनच शक्य आहे. आपल्या भाषेचं राज्य व्हावं म्हणून १०६ हुतात्मे झाले. आपल्या भाषेनं राजा व्हावं म्हणून आपण एक दहा-वीस ई मेल आयडी देणारच ना! वाचनाची आवड असो वा नसो. फ़क्त मराठी साक्षर अशा दहा लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांना वाचनाची आवड आपोआप लागेल. आपणच लावू. लावूच लावू. करूनच दाखवू.

आहे ना : एक दम : तीन कामं.

संपर्क साधा : esahity@gmail.com

www.esahity.com या वेबसाईटला भेट द्या.

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही.

लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान